**गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्फत पायधुनी परीसरात विनापरवाना बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र व काडतुसे विक्रीकरीता आलेल्या ०५ इसमांना ताब्यात घेतल्या बाबत.**

खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, काही इसम पायधुनी परीसरात विनापरवाना बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र व काडतुसे विक्रीकरीता येणार आहेत. प्राप्त माहितीची शहानीशा केली असता, हॉटेल ॲलीगंट,रुम नं. ३०५, नारायण ध्रुव स्ट्रिट, पायधुनी, मुंबई या ठिकाणी खंडणी विरोधी कक्षातील अधिकारी व अंमलदार यांनी छापा टाकला असता, सदर ठिकाणी ०५ इसम मिळुन आले. त्यांच्या ताब्यात ०३ पिस्टल मॅगझीनसह, ०३ मॅगझीन व २१ जिवंत काडतुसे मिळुन आली. त्यांच्याकडे मिळुन आलेल्या वर नमुद अग्निशस्त्र व काडतुसे यांच्या परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे आढळुन आले. त्यांच्या ताब्यात मिळुन आलेली अग्निशस्त्रे व काडतुसे त्यांनी विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. सदर बाबत पायधुनी पोलीस ठाणेस वि.स्था.खं.क्र. ४८८/२०२६ कलम ३,२५ हत्यार कायदा सह कलम ३७(१)(अ),१३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्याची गुन्हे शाखेमध्ये गु.प्र.शा. वि. स्था.ख. क्र. ६८/२०२६ अन्वये पुर्न नोंद घेण्यात आली आहे. नोंद गुन्हयामध्ये खालील नमुद इसमांना अटक करण्यात आली आहे.

१) पुरुष वय २५ वर्षे राठी राजस्थान, २) पुरुष वय २४ वर्षे राठी राजस्थान, ३) पुरुष वय १९ वर्षे राठी हरियाणा, ४) पुरुष वय २६ वर्षे राठी राजस्थान, ५)पुरुष वय २५ वर्षे राठी राजस्थान.

सदरची कामगीरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि विशेष) श्री. सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी प्रथकातील प्र.पो.नि. घनश्याम नायर, पो.निरी. सुनिल पवार, पो.निरी. अरुण थोरात, स.पो.निरी. विशाल मोहिते, स.पो.निरी. रुपेश पाटील व इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडलेली आहे.

-------------